Grade-B (2.88)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY,

P.B. NO.: 80, UMAVI NAGAR, **JALGAON**-425001 (M.S.)

**रोप्य महोत्सवी वर्ष-2014 - 15**

***महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र***


दि. १४/११/२०१४

# गांधी सप्ताह-२०१४

(दि.०२ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर)

माननीय कुलगुरु महोदयांच्या दि १२/०९/२०१४ च्या मान्यतेंनूसार गांधी सप्ताह-२०१४ खालीलप्रमाणेसाजरा करण्यात आला त्याचा वृतांत पुढील प्रमाणे सविनय सादर करीत आहेत.

## दि.०२ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी टेकडीवर भजनांचा कार्यक्रम :-

दि.०२ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या गांधी टेकडीवर भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होता. सुरवातीला प्रास्ताविक करतांना डॉ.अनिल चिकाटे यांनी ०२ ऑक्टोबर हा दिवस जागतीक पातळीवर अहींसा दिवस तर आहेच परंतु या दिवशी स्वच्छता शपथ घ्यावयाची असल्याचे सांगीतले. त्या नंतर माननीय कुलगुरु महोदयांनी त्यांच्या शुभ हस्ते महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला त्यानंतर संगीत विभाग प्रमुख मा प्रा.संजय पत्की आणि त्यांच्या समुहाने महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत गीतरचना सकाळी ८ ते ९ या दरम्यान सादर केली. त्यानंतर माननीय कुलसचिव महोदयांनी जमलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी विद्यार्थी यांना स्वच्छतेची शपथ दिली. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व समन्वयक उपस्थीत होते.

## दि.०७ ऑक्टोबर २०१४ रोजी रक्तदान शिबीर :-

जिल्हा सरकारी रुग्णालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यापीठाच्या विविध विभागातील १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठ ग्रंथपाल डॉ.टि.आर. बोरसे व प्रा.डॉ. ए.बी.चौधरी यांनी जिल्हा सरकारी रुग्णालयाचे डॉ. उमेश कोल्हे आणि त्यांचे् सहयोगी श्री.हरीष पाटील,प्रभाकर पाटील व इतर सहकारी यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. हे शिबीर सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेप्रर्यंत चालले हा कार्यक्रम यशस्ती होण्यासाठी मध्यवर्ती ग्रंथालयाचे कर्मचारी यांचा सहभाग लाभला.

## दि.०८ ऑक्टोबर २०१४ रोजी एकदिवसीय व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन :-

विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजे प्रर्यंत एकदिवसीय व्यक्तीमत्व शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सुरवातीला व्यक्तीमत्व विकास शिबीराचे उद्‌घाटन उपप्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांनी दिप प्रज्वलन करुन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. शिवाजी देवरे हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.डॉ बी.टी. लभाणे, प्रा.पापाला पवार,प्रा,दिपक बाविस्कर, डॉ. आर.के.जाधव उपस्थीत होते. शिबीराचे प्रास्ताविक प्रा.डॉ.संजय ढोडरे यांनी केले तर सुत्र संचालन डॉ.आर.के.जाधव यांनी केले या पूर्ण एकदिवसीय शिबीरात गांधी विचारवंत प्रा.बि.टी. लभाणे, डॉ.आर.के.जाधव,प्रा.दिपक बाविस्कर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या एक दिवसीय व्यक्तीमत्व शिबीरात धुळे येथील महाविदयालयातील १०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या एक दिवसीय व्यक्तीमत्व शिबीराची संपूर्ण जबाबदारी केंद्राचे संचालक प्रा.डॉ. संजय ढोडरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

दि.०९ ऑक्टोबर २०१४ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन :-

विद्यापीठाच्या प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचा विषय **"आजच्या काळात गांधी विचारांची गरज"** असा ठेवण्यात आला होता. या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दुपारी ०२.०० ते ०५.०० या वेळेत विद्यापीठाच्या सामाजीक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात करण्यात आले होते या स्पर्धेत लाईफ सायन्सेस प्रशाळेच्या प्रा.डॉ. संजीवनी भालसींग व गणित प्रशाळेचे प्रा.डॉ.किशोर पवार परिक्षक म्हणुन लाभले होते स्पर्धेच्या सुरुवातीला विचार धारा प्रशाळेच्या संचालीका प्रा.डॉ.अर्चना देगावकर यांनी दोन्ही परिक्षकांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले आणि सहभागी विद्यार्थ्यांना गांधी विचारांवर मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या त्याच प्रमाणे आयोजक डॅा.अनिल चिकाटे यांनी स्पर्धैची प्रस्तावना व विषय मांडणी संदर्भात विद्यार्थ्यांना वेळ व नियम या विषयी सांगीतले या स्पर्धेअंती दोन्ही परिक्षकांच्या निर्णयानुसार बक्षीस म्हणून प्रथम विजेता- अशोराज सुभाष तायडे यास रु५००/-, व्दितीय विजेता-प्रशांत एकनाथ साठे यास रु ३००/-,तृतीय विजेता-कल्पेश भीकनराव देशमुख यास रु २००/- तसेच उत्तेजनार्थ बक्षीसपात्र प्रथम- सारंग बाळकृष्ण येवले रु.१००/- व्दितीय जयपालसींग गोरसीया रु १००/- तृतीय- कल्याणी साहेबराव जवराज रु १००/- अशा प्रकारे या गांधी सप्ताहा पासुन विद्यार्थ्यांना रोख स्वरुपात बक्षिस देण्यात आली.

दि.१० ऑक्टोबर २०१४ रोजी व्याख्यानाचा कार्यक्रम :-

दि.१० ऑक्टोंबर रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. **"गांधी विचारातून युवकांनी घ्यावयाची प्रेरणा"** या विषयावर सेवाग्राम वर्धा येथील प्रा. राम जाधव यांनी सदर विषयावर युवकांना प्रेरीत केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विचार धारा प्रशाळेच्या संचालीका प्रा.डॉ.अर्चना देगावकर उपस्थीत होत्या. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अनिल चिकाटे यांनी पाहूण्यांचा परिचय करुन दिला या कार्यक्रमास शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थीत होते. शेवटी आभार व सुत्र संचालन हर्षल पाटील यांनी केले.

दि.११ ऑक्टोबर २०१४ रोजी चित्रकला स्पर्धा- गांधी जीवन- सत्याग्रह :-

नंदुरबार येथील विद्यापीठाच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्र येथे सकाळी १०.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत गांधी जीवन- सत्याग्रह या विषयास अनुसरुन चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेत नंदुरबार परिसरातील एकूण ६५ शालेय विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. विद्यार्थ्यांना आयोजका तर्फे सहभागी स्पर्धकांना चित्रकलेसाठी पेपर व इतर साहीत्य पुरविण्यात आले होते तसेच सहभागी विद्यार्थ्यांना अल्पोहार देण्यात आल या स्पर्धेची संपूर्णा जबाबदारी नंदूरबार येथील एकलव्य प्रशिक्षण केंद्रामधील स्पर्धा केंद्राचे समन्वय श्री. विरेंद्र वळवी व कार्यालयीन कर्मचारी भिमसेन वळवी यांना परिश्रम घेतले. या स्पर्धेतील एकूण ६५ विद्यार्थ्यामधून निवड समिती ने प्रथम - ममता शरद बैसाणे -रु.५००/ व्दितीय-राहूल संजय सैंदाणे रु.३००/- तृतीय-परमजीत शितलकुमार मगरे रु.२०० तसेच उत्तेजनार्थ म्हणून प्रथम –प्रघुम बाळू चव्हाण रु.१००/- व्दितीय - सचिन भिवसन नाईक रु.१००/- यांची निवड केली. यात इतर विद्यार्थी व पालक त्याच प्रमाणे सन्मानिय नागरीकांचा सहभाग लाभला.

दि.१२ ऑक्टोबर २०१४ रोजी श्रमदान शिबीर,प्रताप तत्वज्ञान केंद्र अमळनेर :-

या गांधी सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी अमळनेर येथे एक दिवशीय श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते सदर श्रमदान शिबिरात अमळनेर परिसरातील महाविद्यालयांचा सहभाग मिळाला असून यात जवळ पास २०० विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. या वेळेस अमळनेर येथील विविध महाविद्यालयांचे एन.एन.एस विभागाचे समन्वय उपस्थित होते जसे डॉ.निसार पटेल,प्रा.संदीप खरे,प्रा धनंजय चौधरी,प्रा. राधिका पाठक. इत्यादी मान्यवर उपस्थीत होते. या शिबीरात धनदाई महाविद्यालय, अमळनेर, नेहरु समाजकार्य महाविद्यालय,प्रताम महाविद्यालय अमळनेर, म.तु.पाटील महाविद्यालय मारवाड या महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता यांनी प्रताप तत्वज्ञान

*केंद्राच्या मागच्या बाजूचा परिसर स्वच्छ केला. नंतर विद्यार्थ्यांनी 'मुलगी वाचवा', 'व्यसनमुक्ती व अंधश्रध्दा' या दोन विषयावर पथनाटय सादर केल त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना अल्पोहार देण्यात आला हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रताप केंद्राचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले शेवटी डॉ.अनिल चिकाटे यांनी सर्व समन्वयांकांचे सहभागी विद्यार्थ्यांचे व प्रताप केंद्रातील शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानले.*

*उपरोक्त गांधी सप्ताह साजरा करण्यासाठी माननीय कुलगुरु महोदयांचे व माननीय कुलसचिव महोदयांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले असून विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ.बोरसे व कर्मचारी, महात्मा गांधी अध्ययन केंद्राचे कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, अधिकारी आणि कर्मचारी त्याच प्रमाणे प्रा सत्यजीत साळवे, संचालक विद्यार्थी कल्याण विभाग,जनसंपर्क अधिकारी, व त्या त्या केंद्रातील कर्मचारी या सर्वांचे सकारात्मक सहकार्य लाभले. या गांधी सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमास सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना "कार्यक्रम सहभाग" प्रमाण पत्र देण्यात आलीत.*

*(डॉ.अनिल नानाजी चिकाटे)*
*प्रभारी प्रमुख*
*महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र*